# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-२७ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १७ मार्च ते २३ मार्च २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


## औरंगजेबाची कबर शासनाने काढावी

### बाबरी ढाच्याप्रमाणे कारसेवा करण्याचा विहिंपसह बजरंग दलाचा इशारा

**पुणे (अट्टल मत प्रतिनिधी)**

गुलामगिरीची, लाचारीची, आणि अत्याचारांची आठवण करून देणारी छत्रपती संभाजीनगर येथील औरंगजेबाची कबर शासनाने लवकरात लवकर काढून टाकावी, अशी समस्त हिंदू समाजाची मागणी आहे. अन्यथा बाबरी ढाच्याप्रमाणे कारसेवा करून ही कबर उद्धवस्त करण्याचा इशारा विहिंप आणि बजरंग दलाच्या वतीने देण्यात आला. शिवजयंतीचे औचित्य साधून सोमवारी राज्यभरातील सर्व जिल्हाधिकारी तसेच तहसीलदार कार्यालयासमोर आंदोलन करून मुख्यमंत्र्यांच्या नावे निवेदन देण्यात येणार आहे.




विश्व हिंदू परिषद प्रांत मंत्री किशोर चव्हाण, बजरंग दलाचे प्रांत संयोजक नितीन महाजन आणि भेगडे यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

चव्हाण म्हणाले, 'आपले संपूर्ण आयुष्य दगाबाजी, विश्वासघात व हिंदू द्वेष यामध्ये घालविणारा, छत्रपती संभाजी महाराज यांचा चाळीस दिवस छळ करणाऱ्या औरंगजेबाची कबर म्हणजे त्याने केलेल्या क्रूर आणि अन्यायाला प्रोत्साहन देण्यासारखे आहे, त्यामुळे कबर हटवली गेली पाहिजे. औरंगजेबाच्या कबरीमुळे आजही त्याच्या विचारसरणीचे अनुयायी इतिहासावर बोट ठेवून त्याच मुघल शासकाच्या पावलावर पाऊल ठेवत या हिंदुस्थानात शरिया कायद्यानुसार वागत आहेत.

## बीड पुन्हा हादरलं! आणखी एकाची क्रूरपणे हत्या

**बीड (अट्टल मत प्रतिनिधी)**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरण, सतीश भोसले प्रकरणांमुळे बीडमधील गुन्हेगारीच्या घटना उघडकीस येऊ लागल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून बीडमध्ये वारंवार हिंसक घटना घडत असून, दररोज मारहाणीचे व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. तर आता बीडमध्ये आणखी एकाची निघृणपणे हत्या करण्यात आली आहे. एका खोलीत दोन दिवस डांबून ठेवत मारहाण करुन ट्रक ड्रायव्हरची हत्या करण्यात आली आहे. बीडमध्ये सातत्याने घडणाऱ्या या घटनांमुळे सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, विकास बनसोडे (२३) असे मृत तरुणाचे नाव असून मागील तीन वर्षांपासून तो आष्टी तालुक्यातील पिंपरी (घुमरी) येथील भाऊसाहेब क्षीरसागर यांच्याकडे ट्रक ड्रायव्हर म्हणून काम करत होता. मात्र क्षीरसागर यांच्या अल्पवयीन मुलीशी विकासचे प्रेम संबंध सुरू आहेत, असा संशय क्षीरसागर यांना होता. त्यामुळे त्याला काही महिन्यांपूर्वी कामावरुन काढून टाकण्यात आले होते. त्यानंतर विकास दोन दिवसापूर्वी त्याच्या मित्रासह पिंपरी गावात राहण्यासाठी आला होता. यावेळी क्षीरसागर यांनी मृत तरुण विकासला त्यांच्या मुलीसह घरामागील शेतात भेटताना पाहिले होते. यामुळे आरोपींनं विकासला दोन दिवस डांबून ठेवत अमानुष मारहाण केली. दरम्यान, ही मारहाण इतकी भयानक होती की यामध्ये विकासचा जागीच मृत्यू झाला. शनिवारी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली आहे. परंतु मारहाण का व कोणत्या कारणावरुन केली याचे कारण अद्याप समोर आले नाही. सध्या मृत तरुण विकासचा मृतदेह प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आला आहे. तसेच राज्य सरकारने गांभीर्याने या प्रकरणाची दखल घेत आरोपीचा शोध घेऊन त्याला फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी ऑल इंडिया पॅंथर सेनेचे अध्यक्ष दीपक केदार यांनी केली आहे.

## शिवनेरी किल्ल्यावर आग्या मोहळ मधमाशांचा पर्यटकांवर हल्लाबोल; अनेक पर्यटक जखमी

**पुणे (अट्टल मत प्रतिनिधी)**

पुण्यातील जुन्नरमधील शिवनेरी किल्ल्यावरआज रविवार असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले. मात्र, सकाळच्या सुमारास शिवनेरी किल्ल्यावर असणाऱ्या शिवाई मंदिर परिसरात आग्या मोहळाने पर्यटकांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात ५० ते ६० जण जखमी झाल्याची माहिती आहे. त्यामुळे शिवनेरी किल्ल्यावर दुर्गप्रेमींची धावपळ पहायला मिळत आहे.यावेळी अनेक लहान मुले देखील किल्ल्यावर असल्याची माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आज रविवार(दि. १६) किल्ले शिवनेरीवरील शिवाई देवी मंदिर परिसरात आग्या मोहळाच्या माशांनी हल्ला केला असून त्यात ५० ते ६० पर्यटक जखमी झाले आहेत.शिवाई मंदिर हे पूर्णपणे माशांनी भरले असून मंदिरात दुर्गपेमी अडकलले आहेत.तर काही विद्यार्थी गडावर अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हल्ला झाल्यानंतर एकच धावपळ सुरू झाली आणि किल्ल्यावरून खाली येण्यासाठी पर्यटक सैरावैरा पळत सुटले. या घटनेची माहित मिळताच आरोग्य विभागाच्या ॲम्बुलन्स शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी दाखल झाल्या आहेत.पोलिसांनी तातडीने पर्यटकांना गडावरून खाली येण्यास सांगितलं. वनविभागाकडून आग्या मोहळ शांत करण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत.

## वेरूळ लेणी येथे पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला,पंधरा ते वीस पर्यटक जखमी

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

खुलताबाद तालुक्यातील जगप्रसिद्ध वेरूळ लेणी क्रमांक १६ मध्ये आज दिनांक १५ मार्च शनिवार रोजी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास लेणी बघण्यासाठी आलेल्या पर्यटकांवर मधमाशांनी अचानक एकाएकी हल्ला करून पर्यटकांना घायाळ करून सोडले यावेळी लेणी बघण्यासाठी आलेले पर्यटकांमध्ये एकच धावपळ उडाली असून पर्यटककांमध्ये भीतीचे वातावरण होते. वेरूळ लेण्यांमध्ये मधमाशांनी वीस ते पंचवीस पर्यंटकांवर हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या गटनेने पर्यंटक सैरावैरा पळू लागले होते. मात्र काही पर्यटकांना वेळीच मदत मिळाल्याने त्यांचे प्राण वाचले आहेत.या घटनेने मोठा अनर्थ टळल्याची चर्चा यावेळी वेरूळ लेणी परिसरात चर्चा सुरू होती सलग सुट्ट्यांमुळे अनेक पर्यटक वेरूळ लेणी बघण्यासाठी आले होते तसेच शनिवारी चार वाजेच्या सुमारास वेरूळ लेणी क्रमांक १६ मध्ये पर्यटकांची मोठी वरदळ होती. मधमाशांचे पोळे अचानक वेरूळ लेणी येथे उठल्याने या मधमाशांनी पर्यटकांवर हल्ला पान ४ वर

## शिर्डीत भाविकांची लूट करणाऱ्या तीन दुकानदारांवर कारवाई

**शिर्डी :** महाराष्ट्रातील प्रसिद्ध देवस्थान असलेल्या शिर्डी साईबाबांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी देशभरातून भाविक शिर्डीच्या साईनगरीत येत असतात. तन-मन-धन या भावनेने साईचे आशीर्वाद घेण्यासाठी येणाऱ्या या भाविकांची स्थानिकांकडून लूट केली जाते. साईचरणी अर्पण करण्यासाठी विक्री होणाऱ्या वस्तू आणि सामानांचे भाव वाढवून भक्तांची लूट करण्यात येते. आता, याबाबत शिर्डीतील नगरपालिकेने कारवाईला सुरुवात केली असून तीन दुकानांना टाळे ठोकण्यात आले आहे. साईभक्तांना मूळ किमतीच्या अधिक किमतीत साहित्य विकणाऱ्या तीन दुकानांवर कारवाई करत नगर परिषदेने या दुकानांना टाळे ठोकल्याने येथील व्यापाऱ्यांना चांगलाच जरब बसला आहे.

साईभक्तांची होणारी फसवणूक आणि लूट लक्षात घेऊन शिर्डीतील ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतल्यानंतर नगरपालिकेने कारवाई केली आहे. विशेष म्हणजे या लुटीसंदर्भात पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल केला जाणार आहे. शिर्डीत साई दर्शनासाठी लाखो साईभक्त येत असतात आणि साई मंदिरात दर्शनासाठी जातांना हार-प्रसादाच्या दुकानातून हार, फुले, प्रसाद खरेदी करतात.

मात्र, भक्तांच्या श्रद्धेचा बाजार मांडून, भक्तांच्या भावनेचा गैरफायदा घेत साई मंदिर परिसरातील हार, फुले आणि प्रसाद व्यावसायिकांकडून भाविकांची लूट केली जात असल्याचे अनेकदा समोर आले आहे. विशेष म्हणजे भाविकांकडून अवाच्या सव्वा दराने विक्री करणाऱ्या तीन दुकानांना नगरपालिकेने सील ठोकले असून पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हाही दाखल केला जाणार असल्याची माहिती आहे.

## अल्पवयीन मुलाच्या हातात कार देणे पडले महागात!

**ठाणे (अट्टल मत प्रतिनिधी)**

राज्यात वाहन परवाना मिळिवण्यासाठी किमान वय १८ वर्षे असणे गरजेचे आहे. तसेच परवान्या शिवाय वाहन चालविणे कायद्याने गुन्हा आहे. असे असले तरी काही नागरिक या कायद्याचा भंग करतात. परंतु पोलिसांच्या तपासणीदरम्यान परवाना नसलेले चालक आढळल्यावर मात्र त्यांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते. असाच प्रकार ठाण्यात उघडकीस आला आहे.

आनंदनगर परिसरातील रस्त्यावर कार चालवित असलेल्या एका अल्पवयीन मुलावर तसेच वाहन परवाना नसतानाही त्याला कार चालविण्यासाठी दिली म्हणून त्याच्या वडीलांवर ठाणे वाहतूक पोलिसांनी दंडात्मक कारवाई केली आहे. त्यांच्याकडून दहा हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे. या कारवाईच्या निमित्ताने अल्पवयीन मुलाच्या हातात कारची चावी देणे वडीलांना महागात पडल्याची चर्चा सुरू झाली आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात ठाणे, कळवा, मुंब्रा, दिवा, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर आणि भिवंडी शहरांचा भाग येतो. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात होळी आणि धुलिवंदनाच्या दिवशी ठाणे वाहतुक पोलिसांनी ठिकठिकाणी पथके तैनात केली होती. ही पथकाने श्वास विश्लेषक यंत्राद्वारे चालकांची तपासणी करीत होती. याशिवाय पोलिसांच्या पथकाने चौका-चौकात उभे राहून नेहमीप्रमाणे कारवाई करत होती.

यावेळी घोडबंदर येथील आनंदनगर भागातील अंतर्गत रस्त्यावर एक अल्पवयीन मुलगा कार चालवित असल्याची बाब वाहतूक पोलिसांच्या कासारवडवली शाखेतील पोलिसांच्या निदर्शनास आली. त्यांनी त्या मुलाला रोखले आणि त्याची चौकशी केली.



## संसद शांत; पण देश तापला

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात फारसा गोंधळ होताना दिसत नसला तरी आगामी काळातील निवडणुकांत हिंदू-मुस्लीम हाच मुद्दा रेटून लावला जाणार असे दिसून येत आहे. पुढील १५ महिन्यांच्या आत देशातील सहा राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे हे विशेष. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू झाला असून त्याचा पहिला आठवडा संपला आहे. आज सोमवारपासून दुसऱ्या आठवड्यास सुरुवात होत आहे. अलीकडच्या काळात सभागृहात ज्या प्रकारचा गोंधळ बघायला मिळतो आहे तो आता थोडा मवाळ झाला असे म्हणावे लागेल. कारण, विरोधक संसदेमध्ये फारसा गोंधळ घालताना दिसत नाहीत. असे असले तरी, विरोधी पक्षांच्या नेत्यांनी आपली तलवार म्यान केली असे अजिबात नाही. लोकसभा आणि राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहात काँग्रेससह तमाम विरोधक भाजप सरकारविरूध्द आक्रमक भूमिका घेऊन आहेत. केंद्र सरकार तपास संस्थेचा गैरवापर करीत असल्याच्या आरोपापासून ते मोगल शासक औरंगजेब आणि हिंदी-तमिळ वादापर्यंत प्रत्येक मुद्द्यावर सरकार विरोधकांच्या रडारवर आहे.

एवढेच नव्हे तर, विरोधकांच्या आक्रमक भूमिकेला प्रत्युत्तर देण्यासाठी सरसावलेल्या सत्ताधारी पक्षांच्या नेत्यांना आपले शब्द मागे घेऊन दिलगिरी व्यक्त करावी लागली. सत्तापक्षाच्या नेत्यांनी चुकीचे शब्द वापरले आणि त्याचा परिणाम पक्षाला भोगावे लागले. यामुळे सत्ताधारी पक्षाने आपल्या नेत्यांना आक्रमक राहून विरोधकांवर हल्ला चढवित राहण्याचा सल्ला देतानाच शब्द थोडे जपून वापरा असा सल्ला सुध्दा दिला. अधिवेशनाच्या दुसऱ्या आठवड्यातील पहिल्या दिवसापासूनच संसदेत औरंगजेबची कबर, मतदारसंघाची पुनर्रचना आणि हिंदी-तमिळ या मुद्द्यांचा प्रभाव दिसून येण्याची शक्यता बळावली आहे. थोडक्यात, देशातील राजकीय वातावरण तापले आहे. औरंगजेबाची कबर उद्ध्वस्त करा अशी मागणी संसदेत केल्यानंतर हिंदुत्ववादी संघटना पुढे सरसावल्या आहेत. विश्व हिंदू परिषद आणि बजरंग दलाने अल्टिमेटमसुध्दा दिला आहे. तिकडे, तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी रूपयाचे चिन्ह बदलून त्याचे तमिळ भाषेतील चिन्ह केले आहे. हा वाद भविष्यात मोठा होण्याची शक्यता आहे. किंबहुना, हिंदी-तमिळच्या मुद्द्याला कमजोर करण्यासाठी औरंगजेबाच्या कबरीच्या मुद्द्याला ऑक्सिजन दिला जाण्याची शक्यता जास्त आहे. कारण, आगामी १५ महिन्यांच्या काळात देशातील सहा राज्यांमध्ये विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यात तमिळनाडूचाही समावेश आहे, हे येथे उल्लेखनीय.

खरे म्हणजे, औरंगजेबाची कबर महाराष्ट्रात आहे. मात्र, महाराष्ट्रात कोणतीही निवडणूक नाही. महानगर पालिका, जिल्हा परिषद आणि नगर पंचायतीच्या निवडणुका प्रलंबित आहेत. मात्र, त्या कधी होतील हे लगेच सांगता येणार नाही. कारण, हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. येत्या ६ मे रोजी पुढील सुनावणी होणार आहे. या सुनावणीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होतील हे कळेल. मात्र, महाराष्ट्रात लगेच कोणतीही निवडणूक नाही. यानंतरही औरंगजेबाच्या कबरीचा मुद्दा रेटून लावला जात आहे. याचा अर्थ हा मुद्दा आगामी काळातील निवडणुकांमध्ये जिवंत राहील असे मानायला हरकत नाही. पुढील १५ महिन्यांत ज्या राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत त्यात बिहार, आसाम, केरळ, तमिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पुद्दुचेरी या राज्यांचा समावेश आहे. यातील बिहार, आसाम आणि पुद्दचेरी या राज्यांमध्ये भाजपचे सरकार आहे. पश्चिम बंगालमधून भाजपचे १२ खासदार लोकसभेवर निवडून आले आहेत. तमिळनाडूमधून भाजपचा एकही नेता खासदार म्हणून निवडून आलेला नाही. केरळमध्ये मध्ये मात्र सुरेश गोपी खासदार म्हणून लोकसभेवर निवडून आले आहेत. आसाममध्ये भाजपचे सरकार आहे. बिहारमध्ये संयुक्त जनता दलासोबत सरकारमध्ये आहे. मात्र, हरियाणा आणि महाराष्ट्रात सत्ता कामय ठेवल्यानंतर आम आदमी पक्षाला भुईसपाट करून दिल्लीत २७ वर्षांनंतर सरकार स्थापन करणाऱ्या भाजपचे पुढील टार्गेट तमिळनाडू, केरळ आणि पश्चिम बंगाल ही तीन राज्ये आहेत. यातील पश्चिम बंगालमध्ये भाजप मुख्य विरोधी पक्ष आहे.

# आनंददायी वसंतोत्सव व श्रीपंचमीच्या शुभेच्छा

हिन्दू दिनदर्शिकेप्रमाणे भारतात माघ आणि फाल्गुन या महिन्यांत वसंत ऋतू असतो. ग्रेगेरीयन दिनदर्शिकेप्रमाणे फेब्रुवारी उत्तरार्ध, मार्च-एप्रिल पूर्वार्ध या महिन्यांत तो असतो. काहींच्या मते त्याचे फाल्गुन आणि चैत्र हे महिने तर शाळांच्या क्रमिक पुस्तकांनुसार चैत्र आणि वैशाख हे महिने आहेत. भारत हा अतिविशाल देश असल्याने देशाच्या विविध भागांत त्यादरम्यान येणारे हिंदू महिने वेगळेवेगळे आहेत. या ऋतूमध्ये झाडाला पालवी फुटते. मात्र वसंत पंचमी- माघ शुद्ध पंचमीपासून वसन्तोत्सव सुरू होतो, हे देशभर मानले जाते. इंग्रजीमध्ये वसंत ऋतूला स्प्रिंग म्हणतात. युरोपात मार्च-एप्रिल हे महिने तर ऑस्ट्रेलियात सप्टेंबर ते नोव्हेंबर महिन्यांत त्याचे आगमन होते, म्हणतात. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा महत्वपूर्ण ज्ञानवर्धक लेख... संपादक.

**(वसंतोत्सव व श्रीपंचमी विशेष)**

वसंताचा उत्सव हा निसर्गाचा उत्सव आहे. तो या दिवसापासून सुरू होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग या ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. यौवन हा जर आपल्या जीवनातील वसंत असेल तर वसंत हे सृष्टीचे यौवन आहे. महर्षी वाल्मीकींनी रामायणात त्याचे अतिशय सुंदर व मनोहारी चित्रण केले आहे. भगवान श्रीकृष्णानेही गीतेत 'ऋतूनाम् कुसुमाकरः' असे म्हणत त्याची बिरुदावली गायली आहे. शिशिर ऋतूत पानगळ- झाडाची पाने वाळून गळून पडतात. ते यात जोमाने येतात, म्हणून वसंताचा उत्सव हे अमर आशावादाचे प्रतीक आहे. त्याचा खरा पुजारी जीवनात कधी निराश होत नाही. जीवन व वसंत ज्याने एकरूप करून टाकले अशा मानवाला आपली संस्कृती संत म्हणते. ज्याच्या जीवनात वसंत फुलतो तो संत! तो यौवन आणि संयम, आशा आणि सिद्धी, कल्पना आणि वास्तव, जीवन आणि कवन, भक्ती व शक्ती, सर्जन व विसर्जन या सर्वांचा समन्वय साधणारा असतो. तसेच जीवनात सौन्दर्य, संगीत व स्नेह प्रकट करणारा वसंत आपल्या जीवनात साकार झाला, तरच आपण त्याच्या वैभवाला जाणले, अनुभवले व पचवले, असे म्हणता येईल. अशा प्रभुस्पर्शींच्या जीवनात नेहमी एकच ऋतू असतो, तो म्हणजे वसंत! त्याची जीवनात एकच अवस्था कायम असते, ती म्हणजे यौवन! संत ज्ञानेश्वरजी महाराज वर्णन करतात-

**'जैसे ऋतुपतीचे द्वारें**
**वनश्री निरंतरें वोगळे फळभारें**
**लावण्येसीं'**



– संकलन व शब्दांकन –
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
(एक प्राणी-पक्षी प्रेमी.)
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

वसंतपंचमीला श्रीपंचमी असेही म्हणतात. श्रीचा अर्थात लक्ष्मीचा हा जन्मदिवस म्हणून या पंचमीस श्रीपंचमी असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे श्रीसरस्वती पूजनोत्सवाचा हा दिवस असल्यामुळे सुद्धा श्रीपंचमी असे म्हणतात. बंगाली बांधव या दिवशी सरस्वतीच्या प्रतिमा पूजतात. सरस्वतीचा नवसही करतात. मुलांचा विद्यारंभ या तिथीपासूनच होतो. काही धर्मशास्त्रकारांच्या मते कामदेव व वसंत ऋतू यांचे निकटचे नाते पुराणांमध्ये वर्णिले आहे, त्यामुळे दिवशी कामदेव-रतीचीही पूजा व प्रार्थना करावी, अशी प्रथा आहे. तथापि त्याप्रीत्यर्थ खास देवालये नसल्यामुळे लक्ष्मी व विष्णू यांची विविध उपचारांनी पूजा व प्रार्थना करून हा दिवस साजरा करण्यात येतो. आपले पारिवारिक जीवन सुखाचे व समृद्धीचे जावे, यासाठी लोक कामदेव-रतीची पूजा करीत असावेत. काही ठिकाणी वसंतपंचमीला नवान्नेष्टी करतात. शेतातून नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्या देवतेला अर्पण केल्यानंतरच नवान्न भक्षण करावयाचे असते, असे सांगितले जाते. कारण-

'आला वसंत ऋतू आलों
वसुंधरेला हसवायालों
सजवीत नटवीत लावण्यालों
आला, आला वसंत ऋतू आलों'

वसंतपंचमीपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत वसंतोत्सव साजरा करतात. प्राचीन काळी वसंत ऋतूच्या आगमनाप्रीत्यर्थ सुवसंतक, वसंतोत्सव, मदनोत्सव, अशोकोत्सव वगैरे उत्सव करण्याची प्रथा होती. या निमित्ताने नृत्य, संगीत, वनविहार, जलक्रीडा आदी मनोरंजनात्मक कार्यक्रम केले जात. काही ठिकाणी रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करून रंग व गुलाल उडवून हा वसंतोत्सव साजरा करण्याची प्रथा आहे. वसंत ऋतूमध्ये वृक्षलतांना नवी पालवी फुटते. त्या पानाफुलांनी बहरतात. त्याप्रमाणेच लोकांच्या मनोवृत्तीही उत्साही व आनंदी होऊ लागतात. हा उत्सव या संक्रमणस्थितीचा द्योतक आहे. निसर्ग- सृष्टीप्रमाणेच मानवी जीवनात आनंद व उत्साह वृद्धिंगत व्हावा, या उद्देशानेच हा उत्सव साजरा करण्याची प्रथा रुढ झाली असावी-

**'चोहीकडून तो वसंत येतो,**
**हासत नाचत गाणे गातो!**
**चराचरांवर जादू करतो,**
**मनामनाला फुलवीत येतो!**
**पक्षीकूजन मधुर ऐकू येते,**
**आसमंत हा गुंगून जावा!**
**फुलाफुलांतून साद उमलते, वसंत घ्यावा, वसंत घ्यावा!'**

माघ शुक्ल पंचमी ही वसंतपंचमी म्हणून ओळखली जाते. वसंत ऋतूच्या शुभारंभाची ही तिथी होय. चैत्र व वैशाख हे वसंत ऋतूचे महिने मानले गेले आहेत, परंतु माघ महिन्यामध्ये उत्तरायणाबरोबर वसंताची चाहूल लागते व वातावरण उत्साहवर्धक होऊ लागते. ऋतुराज वसंताच्या आगमनाप्रीत्यर्थ पाच ऋतूंनी आपल्या कालावधीतील प्रत्येकी आठ दिवस भेट म्हणून दिले आहेत. पाच ऋतूंचे प्रत्येकी आठ दिवस मिळून झालेले हे चाळीस दिवस चैत्र बलिप्रतिपदेपूर्वी म्हणजे वसंतपंचमीपासून सुरू होतात, असे कविकल्पनात्मक स्पष्टीकरण दिले जाते. प्रारंभी हा दिवस वसंत ऋतूच्या संदर्भातच साजरा होत असावा. परंतु नंतर हिंदुधर्म शास्त्रकारांनी तसेच पुराणकारांनी वसंतपंचमीच्या उत्सवाशी काही धार्मिक कथा जोडलेल्या आढळतात. मात्र कविमन गाते-

'हा वसंत रंग भरीत जगती येतसे पहा, बहरल्या दिशा दहा!!
कोकिळा ही उपवनात, अमृत मधुर गीत गात!!
रम्य दिवस चांदरात, फिरत फिरत भृंग हा!!'

वसंतपंचमीच्या दिवशी धार्मिक व्रतविधी फारसे नसतात. या सणाचे लौकिक अंग अधिक ठळकपणे उठून दिसते. वसंत ऋतूत निर्माण होणाऱ्या चैतन्यदायी वातावरणामुळे उल्हासित झालेल्या मनांचा आविष्कार विविध प्रकारच्या मनोरंजक कार्यक्रमांतून व्यक्त होतो. आनंदाचे प्रकटीकरण हाच या सणाचा उद्देश दिसतो. या दिवशी मुलांना कोणाच्याही बागेत जाऊन फळे तोडण्याची मुभा असते. काही ठिकाणी उत्साही मुले होळीसाठी लाकडे, गवत वगैरे गोळा करण्यास वसंतपंचमीपासून सुरुवात करतात. मंजुळ पक्षीरव ऐकतच-

**'नकोत मजला विविध सुरांचे कृत्रिम हे हिंदोळे।**
**कोकिळे ऐकव तव मधुर बोल।।**
**ऋतू वसंतातील कोकिळ कुहूकुहू बोले।**
**पांडुरंग आले आले।।'**

दक्षिण भारतापेक्षा उत्तर भारतामध्ये या सणाला विशेष महत्त्व आहे. राजस्थानमधील राजपूत बांधवांमध्ये हा उत्सव विविधप्रकारे उत्साहाने साजरा केला जातो. समाजातील सर्व थरांतील लोक यामध्ये सहभागी होतात.

रथसप्तमी- राजस्थानातील भानुसप्तमीच्या दिवशी सूर्याची पूजा करून त्याच्या रथाची मिरवणूक काढण्यात येते. हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे. फाल्गुन महिन्यातील वसंतोत्सव फाग या नावाने ओळखला जातो. फाल्गुन पौर्णिमेला वसंतोत्सव समाप्त होतो, असे सर्वसाधारण मत आहे. मात्र महाराष्ट्रात वसंतोत्सवाला फाल्गुन पौर्णिमेपासून प्रारंभ होत असल्याचे सर्व पंचांग व दिनदर्शिकांमध्ये नोंद आढळते. रंगपंचमीपर्यंत चालणारा रंगोत्सव हाच वसंतोत्सव आहे, असे तर अभिप्रेत नसावे? नाहीतर हे एक न उलगडणारे कोडेच म्हणावे लागेल!

!! सर्वांना वसंतोत्सव व श्रीपंचमीच्या आनंददायी हार्दिक शुभेच्छा !!

## भाजपची विधानपरिषद यादी जाहीर; शहरातून संजय केनेकर यांना संधी

**मुंबई :** विधान परिषदेसाठी भाजपने आपली उमेदवारी यादी जाहीर केली आहे. भाजपकडून तीन जणांना उमेदवारी देण्यात आली आहे. दादाराव केचे, संजय केनेकर, संदीप जोशी यांना भाजपकडून विधान परिषदेसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. रविवारी सकाळी भाजपच्या केंद्रीय कार्यालयाकडून तीन जणांची यादी प्रसारित करण्यात आली आहे. यात छत्रपती संभाजीनगर शहरातील निष्ठावान पदाधिकारी संजय केनेकर यांचेही नाव आहे. गेल्या अनेक वर्षांपासून त्यांना या संधीची प्रतीक्षा होत्या. मात्र आता केनेकर यांच्या गळ्यात माळ पडल्याने शिरीष बोराळकर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर दादाराव केचे यांची विधानसभेत उमेदवारी कापून सुमित वानखेडे यांना देण्यात आली होती. त्यामुळे केचे नाराज होते. उमेदवारी नाकारल्यामुळे केचे बंडाच्या तयारीत होते. पण अमित शाह यांनी बावनकुळे यांच्यासोबत त्यांना बोलवत समजूत घातली होती. केचे भाजपचे जुने कार्यकर्ते आहेत.



## ग्रामपंचायत सदस्यपती किराणा दुकानातून विकायचा गांजा

**छत्रपती संभाजीनगर :** साजापूरमध्ये बाजार गल्लीतील किराणा स्टोअर्समध्ये गांजा विक्री होत असल्याची माहिती मिळताच वाळूज एमआयडीसी पोलिसांनी छापा मारून ६ ग्रॅम गांजा जप्त केला. पोलिसांनी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. शुक्रवारी (१४ मार्च) ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना गुप्त बातमीदाराकडून माहिती मिळाली, की साजापूर येथील किराणा दुकानातून गांजा विकला जात आहे. पोलीस उपनिरीक्षक दिनेश बन यांनी सहकाऱ्यांसह किराणा दुकानावर छापा मारला. दुकानात असलेले विलास बाबुलाल गाडेकर (वय ३०) आणि बाबुलाल भाऊराव गाडेकर (वय ५०) यांच्या ताब्यातून ६ ग्रॅम गांजा प्लास्टिकच्या सहा पाउचमध्ये मिळून आला. तो जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज शिंदे करीत आहेत. ग्रामपंचायत सदस्याच्या घराजवळील दुकानातच गांजा सापडल्याने तसेच ज्याच्याविरुद्ध या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तो विद्यमान ग्रामपंचायत सदस्यांचा पती असल्याने ग्रामस्थांत संताप व्यक्त होत आहे. ग्रामपंचायत गावात गांजा व अमली पदार्थांची विक्री रोखण्यासाठी प्रयत्न करत होते की स्वतःच्या अडचणी लपवण्यासाठी खोटी भूमिका घेत होते, असा सवाल आता ग्रामस्थ करत आहेत.

# निपुण महाराष्ट्र अभियान अंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान कृती कार्यक्रम शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

येथील श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयात निपुण भारत अभियानाअंतर्गत पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान कृती कार्यक्रम कार्यशाळा व शिक्षण परिषद उत्साहात संपन्न झाली

या वेळी व्यासपीठावर श्री केशवराज बाबासाहेब विद्यालयातील माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक सिद्धार्थ एडके,प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक बालासाहेब हळणे, जिजामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक रवी पाठक, विवेकानंद विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकर शितोळे,नूतन विद्यालयाचे ज्येष्ठ क्रीडा शिक्षक गणेश माळवे आदीची प्रमुख उपस्थिती होती.

या वेळी महाराष्ट्र शासनाच्या ५ मार्च २०२५ रोजी च्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या शासन निर्णयानुसार प्राथमिक स्तरावर इयत्ता २ री ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत साक्षरता व संख्या ज्ञान कृती कार्यक्रम विषयी सखोल मार्गदर्शन केंद्र प्रमुख एकनाथ जाधव यांनी केले. ते



म्हणाले की हे अभियान ५ मार्च २०२५ ते ३० जुन २०२५ पर्यंत असणार आहे. इयत्ता २ री ते ५ वी च्या विद्यार्थ्यासाठी हे अभियान अनिवार्य असून विद्यार्थ्यांनी अपेक्षित अध्ययन स्तर प्राप्त करण्यासाठी उन्हाळी सुट्टयात देखील ऑनलाईन ऑफलाईन सराव घ्यायचा आहे.

तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी या वर्गासाठी ऐच्छिक आहे. भाषा विषय कृती कार्यक्रम विषयी विजय जोशी यांनी मार्गदर्शन केले.गणित विषय कृती कार्यक्रम विषयी सचिन शहाणे यांनी माहिती दिली तर निपुण भारत अभियान पार्श्वभूमी विषयी योगेश ढवारे यांनी माहिती दिली. या शिक्षण परिषदेस कन्या सेलू केंद्रातील १ ली ते ८ वी चे एकूण १८१ शिक्षक उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन योगेश ढवारे यांनी केले.

# शिवनेरी किल्ल्यावर आग्या मोहळ मधमाशांचा पर्यटकांवर हल्लाबोल; ५० ते ६० पर्यटक जखमी

**पुणे :** पुण्यातील जुन्नरमधील शिवनेरी किल्ल्यावर आज रविवार असल्याने पर्यटक मोठ्या संख्येने दाखल झाले. मात्र, सकाळच्या सुमारास शिवनेरी किल्ल्यावर असणाऱ्या शिवाई मंदिर परिसरात आग्या मोहळाने पर्यटकांवर हल्ला चढवला. या हल्ल्यात ५० ते ६० जण जखमी झाल्याची माहिती आहे. त्यामुळे शिवनेरी किल्ल्यावर दुर्गप्रेमींची धावपळ पहायला मिळत आहे.यावेळी अनेक लहान मुले देखील किल्ल्यावर असल्याची माहिती मिळत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार आज रविवार (दि. १६) किल्ले शिवनेरीवरील शिवाई देवी मंदिर परिसरात आग्या मोहळाच्या माशांनी हल्ला केला असून त्यात ५० ते ६० पर्यटक जखमी झाले आहेत.

शिवाई मंदिर हे पूर्णपणे माशांनी भरले असून मंदिरात दुर्गपेमी अडकलले आहेत. तर काही विद्यार्थी गडावर अडकल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हल्ला झाल्यानंतर एकच धावपळ सुरू झाली आणि किल्ल्यावरून खाली येण्यासाठी पर्यटक सैरावैरा पळत सुटले.

या घटनेची माहित मिळताच आरोग्य विभागाच्या ॲम्बुलन्स शिवनेरी किल्ल्याच्या पायथ्याशी दाखल झाल्या आहेत.पोलिसांनी तातडीने पर्यटकांना गडावरून खाली येण्यास सांगितलं.

वनविभागाकडून आग्या मोहळ शांत करण्याचे शर्तीचे प्रयत्न सुरू आहेत. आगी मोहोळाचा हा हल्ला असून दगड मारल्यानेच आग्या मोहळ उठळे असल्याचे काही पर्यटकांकडून सांगण्यात येत आहे.

अनेक पर्यटक या हल्ल्यात जखमी झाल्यानंतर त्यांना ॲम्बुलन्समधून रूग्णालयात दाखल करण्यात आलंय आणि त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

# सेलू नगरपालिकेचा कारभार भोंगळच



**सेलू (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहराचा पाणीपुरवठा पाणीपट्टी न भरल्याने ते नऊ ते दहा दिवसापासून खंडित झालेला तो खंडित झालेला पाणीपुरवठा शनिवारी सायंकाळी सहा वाजता शहराचा पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे नगरपालिका प्रशासनाने ज्या ज्या भागात पाणीपुरवठा चालू त्या भागात व्हाट्सअप च्या माध्यमातून लोकांना कळवावे कारण की ज्या भागात पाणी सोडत आहे त्या भागात नगरपालिका प्रशासनाने कळिवणे महत्त्वाचे आहे कारण की पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे आठवडी बाजार अण्णाच्या बियर शॉपीच्या बाजूला रात्रीचा एक वाजून पंधरा मिनिटाचा हा फोटो आहे रात्री एक वाजून सव्वा मिनिटाचा पाणी वाया जात असताना घेतलेले आहे ज्या ठिकाणी पाणी सोडलेला आहे त्या ठिकाणी नागरिक झोपेमध्ये आहे कारण की नळातून पाणी वाया जात आहे असा हा कारभार सेलू नगरपालिकेचा आहे नागरिकांना जर माहित झाले असते तर ते पाणी भरण्यासाठी जागरूक राहिले असते त्यांना माहितीच नाही पाणी सुटलेला नळातून पाणी वाया जात आहे याला जबाबदार कोण?

# ‘आरएसएसला समजून घेणे सोपे नाही, त्यांचे कार्य समजून घेणे आवश्यक’

नवी दिल्ली : ‘बालपणापासूनच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस)च्या बैठकांना उपस्थित राहणे माझ्यासाठी आनंददायी होते. आपण देशासाठी समर्पित जीवन जगावे हे मला ‘आरएसएस’ने शिकवले. या वर्षी १०० वर्षे पूर्ण करणाऱ्या ‘आरएसएस’पेक्षा जगात अन्य दुसरा मोठा ‘स्वयंसेवी संघ’ नाही. आरएसएस समजून घेणे सोपे काम नाही, त्याचे कार्य समजून घेणे आवश्यक आहे, अशी अपेक्षा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केली. अमेरिकन पॉडकास्टर लेक्स फ्रिडमन यांनी घेतलेल्या विशेष मुलाखतीमध्ये ते बोलत होते. यावेळी पंतप्रधान मोदींनी लेक्स फ्रिडमन यांच्याशी विविध मुद्यांवर चर्चा केली.

यावेळी नरेंद्र मोदी ( छरीशपवीर चेवळ ) म्हणाले की, मला ‘आरएसएस’सारख्या प्रतिष्ठित संघटनेकडून जीवनाचे सार आणि मूल्ये शिकायला मिळाली यासाठी मी स्वतःला भाग्यवान समजतो. देशाची सेवा करणे हे मला ‘संघ’नेच हेच शिकवले. या वर्षी आरएसएस १०० वर्षे पूर्ण करत आहे. जगात आरएसएसपेक्षा मोठी ‘स्वयंसेवी संघटना’ नाही. आरएसएस समजून घेणे सोपे काम नाही, त्याचे कार्य समजून घ्यावे लागेल. राष्ट्र हेच सर्वस्व आहे आणि समाजसेवा हीच देवाची सेवा आहे, हे आरएसएस सदस्यांना शिकवते.

आपल्या वैदिक संतांनी आणि



स्वामी विवेकानंदांनी शिकवले तेच संघही शिकवतो. शिक्षणात क्रांती घडवून आणण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या काही सदस्यांनी ‘विद्या भारती’ नावाची संघटना सुरू केली. ते देशभरात सुमारे २५ हजार शाळा चालवतात. या शाळांमध्ये एकावेळी ३० लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. डाव्या विचारसरणीच्या लोकांनी चालवलेली कामगार चळवळ ‘जगातील कामगारांनो, एकत्र या!’ अशी आहे. तर आरएसएसची कामगार संघटना ‘कामगारांनो, जगाला एकत्र करा!’ असा नारा देते, असेही नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान मोदींना गुजरातच्या २००२ मधील दंगल प्रकरणावरही प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी मोदींनी मौन सोडत गुजरात दंगल प्रकरणावरही भाष्य केलं. तसेच जे त्या प्रकरणात दोषी होते, त्यांना कायद्यानुसार शिक्षा झाल्याचे त्यांनी सांगितले. २००२ च्या गुजरात दंगलींकडे मोदी कसे पाहतात? असं विचारलं असता मोदी म्हणाले की, ङ्ग२००२ च्या दंगली भोवतीच्या चर्चेला खोटी कहाणी निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. २००२ पूर्वी गुजरातमध्ये २५० हून अधिक दंगली झाल्या होत्या आणि जातीय हिंसाचार वारंवार होत होता. २००२ पूर्वी देशात सतत दहशतवादी हल्ले आणि अस्थिरतेचे वातावरण होते, त्यामुळे तणाव शिगेला पोहोचला होता. तेव्हा जगातही दहशतवादी कारवायांमध्येही वाढ दिसून आली होती. १९९९ मध्ये कंधार अपहरण प्रकरण झालं होतं, २००० मध्ये लाल किल्ल्यावर हल्ला झाला होता आणि २००१ मध्ये आपल्या संसदेवर हल्ला झाला होता. तो काळ मोठ्या आव्हानांचा होता. पण २००२ नंतर गुजरातमध्ये एकही मोठी दंगल घडलेली नाही. आता राज्यात कायम स्वरूपी शांतता आहेङ्ख, असे मोदी म्हणाले.

पीएम मोदी यांनी पाकिस्तानाबाबत आपली मते स्पष्ट केली. ते म्हणाले की, १९४७ पूर्वी सर्वजण खांद्याला खांदा लावून स्वातंत्र्यासाठी लढत होते. त्यानंतर देशाच्या धोरणकर्त्यांनी भारताची फाळणी मान्य केली आणि मुस्लिमांना त्यांचा देश दिला. हे भारतातील जनतेने मोठ्या जड अंतःकरणाने मान्य केले, पण त्याचे परिणाम ही भोगावे लागले. या फाळणीमुळे झालेल्या हत्याकांडात लाखो लोक मारले गेले.

# एकनाथ शिंदे यांचा जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पुरस्काराने सन्मान

## ‘वारकरी संप्रदायामार्फत संतांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे काम’

**पुणे :** संत तुकोबांनी जगण्याचे तत्त्वज्ञान अभंगाच्या माध्यमातून सोप्या भाषेत सांगितले. या संतांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे लाखमोलाचे काम वारकरी संप्रदाय करत असून कीर्तनाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कामही वारकरी संप्रदाय करत आहे, असे गौरवोद्गार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

जगद्गुरु श्री तुकोबाराय त्रिशकोत्तर अमृत महोत्सवी ३७५ वा सदेह वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त देहू येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वारकरी संप्रदायातील सर्वश्रेष्ठ जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पुरस्कार प्रदान करण्यात आला, त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी खासदार श्रीरंग बारणे, आमदार विजय शिवतारे, शरद सोनवणे, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, देहू संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, अक्षय महाराज मोरे, आळंदी संस्थानचे योगी निरंजन नाथ आदी उपस्थित होते. वारकरी संप्रदायातील हा सर्वश्रेष्ठ पुरस्कार प्रेरणादायी ठरेल असे सांगून उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, ज्ञानोबा-तुकोबांच्या जयघोषाने प्रेरणा मिळते. रंजल्या-गांजल्यांची सेवा करण्याचे बळ संत तुकारामांच्या अभंगातून मिळते. नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने मराठी भाषेचा अभिमान वाढला आहे. परंतु, तुकाराम महाराजांनी ४०० वर्षांपूर्वीच क्लिष्ट तत्त्वज्ञान सर्वांना समजेल अशा सोप्या मराठी भाषेत सांगितले.

भेदभाव न करता लोकहितासाठी काम करण्याचा उदात्त संदेश त्यांनी दिला. तुकोबांच्या संदेशानुसार शासन काम करत असून सर्वसामान्यांना न्याय देण्याचे, त्यांच्या आयुष्यात सुख- समाधान आणण्यासाठी, राज्याच्या विकासासाठी काम करत आहे. वारकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णय शासनाने घेतले आहेत. वारकऱ्यांच्या सोयीसाठी देहू येथे आवश्यक असणारी सर्वतोपरी मदत शासन करेल, अशी ग्वाही श्री. शिंदे यांनी दिली.

पंढरपूर येथे आषाढी वारीसाठी लाखो वारकरी येत असतात. आषाढी एकादशीला विठ्ठलाची महापूजा सुरु असताना दर्शन बारी सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. वारकऱ्यांना सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. निसर्गाचे रक्षण करणेही आपले कर्तव्य आहे. नद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी ठोस प्रयत्न शासन करत आहे. नद्यांच्या प्रदूषण मुक्तीची चळवळ ही लोकचळवळ व्हावी, देशातील सर्वात आदर्श नद्या महाराष्ट्रात आहेत असा नावलौकिक करुया, असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. ते म्हणाले, तरुण पिढीसाठी संत तुकाराम यांची गाथा ई-बुक स्वरूपात उपलब्ध करुन देण्याचे काम मराठी भाषा विभागाच्या वतीने करण्यात येत असून लवकरच सर्व शाळांमध्ये हे ई-बुक उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. यावेळी मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

# हडको जैन मंदिरात सिद्ध चक्र विधानास प्रतिसाद; राजा बाजार मंदिराचे पदाधिकाऱ्यांनी घेतले भगवान चंद्र प्रभु दर्शन घेतले



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

हडको चंद्रप्रभू खंडेलवाल दिगंबर जैन मंदिर येथे सिद्धचक्र विधानाचार्य संजय कुमार यांच्या सानिध्यात होत आहे त्यात हजारो महिला आणि पुरुष यांनी भाग घेतलेला आहे सौ धर्मेंद्रचा मान अरुणा रमेश छाबडा यांना मिळाला आहे रोज सकाळी नित्याभिषेक होऊन विधान दुपार एक वाजेपर्यंत चालत आहे तसेच संध्याकाळी महाआरती पण होते

असे अध्यक्ष कैलास कासलीवाल कार्यकारी अध्यक्ष राजकुमार बड जाते विधान संयोजक संजय कुमार पाटणी खंडाळ्या वाले परीश्रम करत आहे. राजा बाजार मंदिराचे ट्रस्टी पचायत अध्यक्ष महावीर पाटनी, सचिव प्रकाश अजमेरा, कीरन पहाडे, सतोष सेठी, अरुण पाटनी, महावीर ठोले, प्रमोद पाटनी, संजय पहाडे चद्रसागर धर्मशाळा सचिव, श्रेणीक कासलीवाल, अजीत लोहाडे, रमेश पाटनी, निरज बडजाते, सूरेखा पाटनी, यानी चंद्र प्रभु मंदिरात भगवताचे दशन घेतले त्यांचे स्वागत करण्यात आले सम ाजबाधव ट्रस्ट अध्यक्ष कैलास कासलीवाल दिलीप लोहाडे राजकुमार बडजाते संगीता बडजाते, अमित गंगवाल, सुमन गंगवाल, रमेश छाबडा, अरुणा छाबडा, राणी बाकलीवाल, सुमीत बाकलीवाल, किरण कासलीवाल, मीना पापडीवाल, ललीता काला , सतिष ठोळे, डॉ. शैलेश चांदीवाल, संतोष पाटणी, अशोक अजमेरा, राजू लोहाडे, पंकज काला, दिनेश पाटोदी, रुपेश छाबडा, आशा कासलीवाल, कविता अजमेरा अशोक पहाडे, संजय पाटणी, प्रकाश शेठी ज्योती सेठी पुष्पा गंगवाल, पुष्पा ठोळे, मंजू पाटणी, राहुल कासलीवाल, बबलू कासलीवाल, नीलिमा ठोळे मीना कासलीवाल, रिदम पाटणी पुष्पक बडजाते संगीताकाला अक्षय काला राजश्री कासलीवाल अरुणा ठोळे कल्पना पहाडे सोनाली पांडे कैलास काला मुकेश गंगवाल, उज्वला अजमेरा, त्रिशला सेठी, कांता काला, सरला कासलीवाल, आदी उपस्थित होते अशी माहिती नरेंद्र अजमेरा, पियुष कासलीवाल यांनी दिली.



दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नांदेड येथे श्री हुजूर साहेब गुरुद्वारा सचखंड तर्फे होली हल्लाबोल पारंपरिक रिवाजने साजरा झाला.. मोठ्या संख्येने भाविक भक्त सहभागी झाले आहेत..

# वाहनावर फास्टॅग लावा अन्यथा दुप्पट पैसे भरा

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

प्रत्येक टोल प्लाझावर फास्टॅगचा वापर अनिवार्य करणे तसेच रोख देयकांसाठी (पेमेंट) दुप्पट शुल्क आकारण्याच्या राज्य सरकारच्या धोरणात्मक निर्णयात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण आम्हाला आढळून नाही, असे निरीक्षण नोंदवून फास्टॅग सक्तीच्या निर्णयाला आव्हान देणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने गुरूवारी फेटाळली. त्यानंतर आता १ एप्रिलपासून राज्यातील सर्व टोल प्लाझावर फास्टॅग अनिवार्य करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. फास्टॅग न वापरणाऱ्या वाहनधारकांना दुप्पट रोखरक्कम द्यावी लागणार आहे.

टोलची प्रक्रिया अधिक कार्यक्षम करण्यासाठी आणि टोलवरील लागणारा वेळ व फास्टॅगचा गोंधळ टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आल्याचं एमएसआरडीसीच्या एका अधिकाऱ्याने सांगितलं. हा निर्णय भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (एनएचएआय) निश्चित केलेल्या धोरणांशी आणि रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निर्देशाशी सुसंगत असल्याचं स्पष्ट करण्यात आलं आहे.

**'या' टोल प्लाझावर फास्टॅग अनिवार्य ?** – मुंबईतील पाच टोलनाके एमएसआरडीसीकडे आहेत. मुलुंड पश्चिम, मुलुंड पूर्व, ऐरोली, दहिसर आणि वाशी या पाच टोल नाक्यांवर स्कूल बसेस, हलकी मोटार वाहने आणि राज्य परिवहन बसेसना कोणताही टोल आकारला जात नाही. तर, मुंबई-पुणे एक्स्प्रेसवे, जुना मुंबई-पुणे महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग, वांद्रे-वरळी सी लिंक, सोलापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, नागपूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, छत्रपती संभाजी नगर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प, काटोल बायपास आणि चिमूर-वरोर-वणी महामार्गचं व्यवस्थापनही एमएसआरडीसीकडे आहे. या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना फास्टॅग अनिवार्य आहे. अन्यथा वाहनधारकांना दुप्पट पैसे द्यावे लागणार आहेत.

**फास्टॅग सक्तीचा निर्णय उच्च न्यायालयाकडून कायम –**

मुंबईत हलक्या वाहनांना, शाळेच्या बसला पथकरमाफी आहे. त्यानुसार मुंबईच्या प्रवेशद्वारावरील पाचही पथकर नाक्यांवर या वाहनांसाठी स्वतंत्र मार्गिका असून तेथे फास्टॅग प्रणाली कार्यान्वित करण्यात आलेली नाही. त्यामुळे मुंबई, एमएमआरमध्ये प्रवास करणाऱ्या वाहनांपैकी अनेक वाहनांना फास्टॅग नसण्याची शक्यता आहे. पण यापुढे त्यांनाही फास्टॅग प्रणालीशी खाते जोडावे लागेल. कारण वांद्रे-वरळी सागरी सेतू आणि अटल सेतूवर पथकर वसुली करण्यात येते.

पान १ वरून

## वेरूळ लेणी येथे पर्यटकांवर मधमाशांचा हल्ला,पंधरा ते वीस पर्यटक जखमी

चढवला. अचानक हल्ला झाल्यामुळे पर्यटकांना काही करावे हे सुचेना. या मधमाशीच्या हल्ल्यामध्ये २० ते २५ पर्यटक जखमी झाले आहेत. काही पर्यटकांनी जीव वाचवण्यासाठी लेणी मध्ये पर्यटकाची धावपळ सुरू झाली होती. जगप्रसिद्ध वेरूळ लेणी मध्ये पर्यटकांना मधमाशांनी चावा घेतल्यामुळे लेणी परिसरात पर्यटकांची मोठी तारांबळ उडाली घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन. वेरूळ येथील सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र सावजी.यांनी पर्यटकांना वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र येथे प्रथम उपचारासाठी दाखल केले सामाजिक कार्यकर्ते नरेंद्र सावजी यांनी काही पर्यटकांना वेरूळ येथील प्राथमिक आरोग्य केंद्र व तसेच काही पर्यटकांना खाजगी मंगल क्लिनिक येथे आणून प्रथमोपचार केले.यावेळी विविध राज्यातून आलेले पर्यटकावर वेरूळ लेणी

येथे मधमाशांचा हल्ले नगर दिल्ली मुंबई दिल्लीहून आलेले पर्यटक रमेश सिंग यांनी बोलताना सांगितले की आम्ही तिघेजण वेरूळ लेणी बघण्यासाठी आलो होतो मात्र येथे आल्यावर एकाएकीच मधमाशांनी हल्ला केला व माझ्या सह आलेले माझे मुंबईचे मित्र प्रतीक सिंग आणि आदित्य हे यांना ही मधमाशांनी जखमी केले आहे.

**पुरातत्व विभाग निद्रावस्थेत**

ही नेहमीचीच घटना दरवर्षी उन्हाळ्यात मधमाशांद्वारे पर्यटकांवर होणारे हल्ले येथे आलेल्या पर्यटकांसाठी आणि नित्याचीच झाली असून भारतीय पुरातत्त्व विभाग याप्रकरणी काहीही प्रयोग करत असल्याचे दिसत नाही.

परिणामी लहान मुले, अबाल वृद्ध तसेच खास महिला वर्गांमध्ये एकाएकी होणाऱ्या हल्ल्यामुळे आलेल्या पर्यटकांना पाय घसरून पडणे, पाय मोचकणे इत्यादी स्वरूपाच्या गंभीर जखमाही होत आहेत. तरी भारतीय पुरातत्त्व विभागाने खबरदारी म्हणून लेणी परिसरामध्ये मधम ाशांचे मोहोळ बसू न देणे हाच एक मात्र उपाय आहे. तरी त्यांनी यापुढे खबरदारी घ्यावी – सामाजिक कार्यकर्ते सतीश देवेंद्र लोखंडे.

## शिवनेरी किल्ल्यावर आग्या मोहळ मधमाशांचा पर्यटकांवर हल्लाबोल; अनेक पर्यटक जखमी

आगी मोहोळाचा हा हल्ला असून दगड मारल्यानेच आग्या मोहळ उठळे असल्याचे काही पर्यंटकांकडून सांगण्यात येत आहे. अनेक पर्यटक या हल्ल्यात जखमी झाल्यानंतर त्यांना ॲम्बुलन्समधून रूग्णालयात दाखल करण्यात आलंय आणि त्यांच्यावर सध्या उपचार सुरू आहेत.

# अखिल भारतीय बळीराजा संघटनेची बैठक संपन्न; विविध पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

बैठकीमध्ये पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यात प्रदेशाध्यक्षपदी शिवाजीराव साळुंके पाटील, प्रदेश सचिवपदी जि.के. गाडेकर पाटील, जिल्हाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर बाळासाहेब राजे भोसले, मराठावाडा सो. मी प्रमुखपदी शंकर चेडे पाटील, छत्रपती संभाजीनगर तालुकाअध्यक्ष पदी वाल्मिक कार्ले पाटील, कन्नड तालुका अध्यक्षपदी बापू लोखंडे, तालुका उप अध्यक्षपदी गोपीचंद पळसकर पाटील, अल्पसंख्याक जिल्हा अध्यक्षपदी मोईनोद्दीन शाह, तालुका संघटक रवींद्र जगदाळे पाटील इत्यादींची निवड संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांनी केली. बैठक छत्रपती संभाजीनगर शहरातील सुभेदारी गेस्ट हाउस येथे उत्साहात पार पडली. शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी सदैव लढणार तसेच कोणत्याही अडचणी सोडवण्यासाठी कसलाही विचार न करता शासनाबरोबर न्याय हक्कासाठी तत्पर राहणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष निवृत्ती डक पाटील यांनी सांगितले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक – श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.